महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९ Email- rajesh.wadnekar@nic.in

क्रमांक:-युआर २०२४/कौशल्यविकास युआर-१२/का-४ दि:-११ नोव्हेंबर,२०२५

प्रति,

प्रबंधक (मूळ शाखा),
मा.उच्च न्यायालय,
मुबई.

**विषय:**-कौशल्य,रोजगार,उद्योजगता व नाविन्यता विभागाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२,२०१२-१३, २०१३-१४ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेल्या न्यायाधिशांची नावे पाठविण्याबाबत.

संदर्भ:-१) या विभागाची क्र.युआर २०२४/कौशल्यविकास युआर-११/का-४,
दि.१६.०९.२०२४ व २२.१०.२०२४ चे पत्रे.
२) आपले क्र.जी/१८६२/१४४९/२०२४,दि.२३.१०.२०२४ चे पत्र.

महोदय,

या विभागाच्या अनु.क्र.१ येथे नमूद संदर्भाधीन पत्रांन्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२,२०१२-१३, २०१३-१४ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेल्या न्यायाधिशांची नावे सादर करण्याबाबत आपणास विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आपण अनु.क्र.२ येथील पत्रान्वये याकरीता अदयाप कोणत्याही सेवानिवृत्त मा.न्यायाधीश महोदयांकडून इच्छूकता प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.

२. तथापि या संदर्भात कौशल्य,रोजगार,उद्योजगता व नाविन्यता विभागाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सदर बाब ही विधानमंडळाशी संबंधीत आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२,२०१२-१३, २०१३-१४ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेल्या न्यायाधिशांची नावे सादर करण्याबाबत आपणास पुन्हा विनंती करण्यात येत आहे. तरी सदर माहिती कृपया तात्काळ पाठविण्यात यावी,ही विनंती.

आपला,

(रा. सु. वडनेरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

कक्ष अधिकारी (व्यशि-१), कौशल्य,रोजगार,उद्योजगता व नाविन्यता विभाग,मंत्रालय,मुंबई.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई 400 032.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९
ई-मेल -rajesh.wadnerkar @nic.in

क्रमांक :- यूआर २०२४/कौशल्य विकास युआर ११/का.४
दिनांक : १६ सप्टेंबर, २०२४.

प्रति,

प्रबंधक,
मुळ शाखा,
मुंबई उच्च न्यायालय,
मुंबई.

**विषय :-** मा. लोक आयुक्त यांच्या शिफारशीनुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांची नांवे पाठविण्याबाबत...

महोदय,

श्री. ज.द. भुतांगे, तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. लोक आयुक्त यांच्याकडे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्रशासकीय व वित्तीय अनियमितता करुन तसेच पुरवठादारांशी संगनमत करुन अंदाजे १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक शासकीय निधीच्या भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने सुरु असलेल्या चौकशीचा अद्याप निर्णय न झाल्याबद्दल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२१.०६.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. लोक आयुक्त यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात यावी तसेच सदर प्रकरण लाचलूचपत विभागाकडे संदर्भित करावे, अशी शिफारस केली आहे.

२. उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार, मा. लोक आयुक्त यांच्या शिफारशीनुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांची नांवे तातडीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता उच्च न्यायालय प्रशासनाकडून सदर माहिती तातडीने दि. २६ सप्टेंबर, २०२४ पर्यन्त या विभागास पाठविण्याची विनंती मा. उच्च न्यायालय प्रशासनास करण्यात येत आहे.

आपला,

( राजेश सु. वडनेरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

३०/०९/२०२४